## नियमित दिवाणी दावा क्रमांक ५७०/२०२४ मधील आदेश नि.क्र.१८

(CNR No. MHSO130006562024)

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला एकतर्फा चौकशी आदेश रद्दबातल करण्यात येवून त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी याबाबत विनंती केली आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

३. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांना समन्स दि.६/९/२०२४ रोजी बेलिफ अहवालाप्रमाणे प्राप्त झाल्याचे दिसते. समन्स प्राप्त होऊन देखील प्रतिवादी दाव्याचे कामी हजर राहिले नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द दि.२२/११/२०२४ रोजी एकतर्फा चौकशी आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द पारीत एकतर्फा चौकशी आदेश रद्दबातल होवून त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केली आहे. सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यास दाव्यामध्ये हजर राहण्याची परवानगी देऊन प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादीतर्फे अर्जामध्ये नमूद केलेले कारण हे प्रतिवादीविरुध्द पारीत आदेश रद्दबातल करण्याकरिता संयुक्तिक व समाधानकारक वाटत आहे. अशा परिस्थितीत न्यायाचे हित ध्यानात घेऊन प्रस्तुत अर्ज मंजूर करणे उचित होईल. प्रतिवादी यास न्यायालयात मुदतीत हजर राहण्यास व कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब विचाराधीन घेता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादीने रक्कम रुपये रु.६००/– (रक्कम रुपये सहाशे) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने वादीस खर्च दिल्यानंतर त्यांचेविरुध्द पारीत एकतर्फा चौकशी आदेश रद्दबातल करण्यात येऊन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

३. प्रतिवादीने वादीस खर्चाची रक्कम पुढील सुनावणीपर्यंत द्यावी.

HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Date: 2025.06.20 17:12:23 +0530

(श्रीमती ह.उ.उ.पाटील)

दिनांकः– २०/६/२०२५ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital (Grade III) |
| (b) | Court | : | Smt.H.U.U. Patil,<br>3rd Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 20/6/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 21/6/2025 |